ePaper
राज्यात अवकाळीचा तडाखा; महाराष्ट्राला पावसानं झोडपलं
| वर्ष - 8 | अंक - 286 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

आतील पानांत
- नाद करा पण आमचा कुठं..!
- कुलदीप यादवने घडवला इतिहास!
- पाकिस्तानात सिंधू पाणी प्रश्न पेटला!
- तालिबानने भूमिका बदलली

www.mahaenews.com | गुरुवार, दि. 22 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### 30 ते 35 जहाल दहशतवादी शस्त्रगोळ्यासह भारतात घुसण्याच्या तयारीत

# बिथरलेला पाकिस्तान, नेपाळमार्गे कारस्थान!

## पाकिस्तानात प्रचंड पाणीबाणी : संतप्त जमाव रस्त्यावर : सिंधच्या गृहमंत्र्याचे घर दिले पेटवून

। नवी दिल्ली, काठमांडू, इस्लामाबाद ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**भारताने हाती घेतलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' च्या प्रचंड यशानंतर आणि पाकड्यांची मोठ्या प्रमाणावर हानी झाल्यानंतर युद्धविराम झाला खरा, पण त्यामुळे पाक सरकार, पाकचे लष्कर आणि तेथील दहशतवाद्यांचे म्होरके प्रचंड बिथरले आहेत. आता, त्यांच्या नवीन कारस्थानानुसार नेपाळमार्गे भारतात घुसण्याचा त्यांचा प्रयत्न असून नेपाळमध्ये ३० ते ३५ जहाल दहशतवादी घुसण्याच्या तयारीत आहेत. त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर दारुगोळा, मोठा लवाजमा, आधुनिक शास्त्रास्त्रे आणि निश्चित हल्ला करण्याची ठिकाणे असल्याचे नकाशे आहेत, अशी खात्रीशीर माहिती भारताच्या वरिष्ठ नेत्यांच्या हाती आलेली आहे.**

### सतर्क भारत, अस्वस्थ पाकिस्तान..

भारताने पाकिस्तानवरील कारवाई तात्पुरती थांबवली असली, तरी भारतीय सैन्य, गुप्तचर यंत्रणा, सीमा सुरक्षा दल, क्षेपणास्त्रे आणि ड्रोणविरोधी यंत्रणा चोवीस तास सतर्क ठेवण्यात आली आहे. पाक प्रचंड दुखावला गेला असून कोणत्याही परिस्थितीत बदला घेण्यासाठी ते कोणत्याही थराला जाणार, ही भारताच्या अधिकाऱ्यांना आणि संरक्षण दलाला पूर्णपणे कल्पना आहे.

### भारताच्या सतत उच्चस्तरीय बैठका..

पाककडून काहीतरी कुरापती सतत काढण्यात येणार असल्याच्या कल्पनेने आणि अपेक्षेने भारताने उच्च पातळीवर बैठकांचा सतत धडाका लावला आहे. देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी भारतीय सैन्याची तिन्ही दले, सीमा सुरक्षा दल नेहमीच सतर्क आणि सज्ज असल्याचे सुरक्षा यंत्रणांकडून सांगण्यात येते.

### पाकमध्ये पाणीबाणी, गृहमंत्र्यांचे घर पेटवले..

पहलगामच्या भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर सिंधू नदीचे पाणी अडवण्याचा भारताने निर्णय घेतला. या निर्णयाचे पडसाद आता पाकमध्ये उमटत असून सिंधू नदीच्या खोऱ्यातील पाण्याचा प्रश्न भीषण झाला आहे. भारताने पाणी रोखल्याने सिंधमध्ये गृहयुद्ध सदृश्य परिस्थिती आहे. असंतोष इतका भडकला आहे की, आंदोलकांनी सिंधच्या गृहमंत्र्याचे घरच पेटवून दिले तर शेकडो जखमी झाले आहेत.





### चोहोबाजूनी कोंडी, पाकडे बिथरले..

पाकड्यांची चोहोबाजूने कोंडी सुरू आहे. एकीकडे सिंधू नदीचे पाणी भारताने अडवले आहे, तर दुसरीकडे सरकारच्या सहा कालवे प्रकल्पाला सिंध प्रांतातील नागरिकांचा प्रचंड विरोध सुरू आहे. रस्त्यावर उतरून आंदोलक मोर्चे काढत आहेत. या आंदोलनाला हिंसक वळण

### पोलिसांवर हल्ले, मग जाळपोळ

सिंध प्रांतातील राष्ट्रीय महामार्गावर मोरो शहरात गृहमंत्र्याचे घर आहे. नंतर आंदोलकांनी पोलिसांना मारहाण केली आणि नंतर आंदोलकांनी पोलिसांसह गृहमंत्र्याच्या घरावर हल्ला चढवला. त्यानंतर, पोलिसांची वाहने पेटवून देण्यात आली. या आंदोलनात, काही आंदोलकाचा मृत्यू झाल्यानंतर जमाव हिंसक झाला. एक डीएसपी आणि इतर शेकडो पोलीस जखमी झाले आहेत. पेटवून दिले. आंदोलकांच्या हाती यावेळी बंदुका होत्या. या बंदुकातून अनेकांनी हवेत गोळीबार केला. गृहमंत्र्याच्या घरातील काही लोकांना मारहाण करण्यात आली. आंदोलकांनी यावेळी शेकडो वाहनेही पेटवून दिली.

मुद्दा पाकिस्तान पीपल्स पार्टीच्या (पीपीपी) नेतृत्वातील सिंध सरकार आणि केंद्र सरकार यांच्यात वादाचा मुद्दा आहे. पंतप्रधान शाहबाज शरीफ सरकार चोलिस्तानमधील वाळवंटात सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयोग राबवण्याच्या तयारीत आहे आणि त्याला स्थानिकांचा तीव्र विरोध आहे.

### सिंध प्रांताची डोकेदुखी आणि सरकारला विरोध

चोलिस्तान कालवा प्रकल्पासाठी अंदाजे २१२ अब्ज रुपयांचा खर्च येईल. त्या माध्यमातून हजारो एकर नापीक जमीन शेतीयोग्य होईल. त्यातून मोठे उत्पन्न घेता येणार आहे. सुमारे चार लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे. पण, सिंध लोकांसाठी ही पण एक डोकेदुखी ठरणार आहे. पाणी तर हातचे जाईलच. पण, सर्वाधिक उत्पन्न घेणारा प्रांत म्हणून असलेली ओळख धोक्यात येण्याची भीती पण आहे. त्यामुळे पाक नागरिक आणि पाक लष्कराचा सिंध प्रांतावरचा राग असून तो वेळोवेळी उमटत असतो. बलुचिस्तानपाठोपाठ सिंध प्रांतही पाकिस्तानच्या जोखडातून मुक्त करावा, अशी मागणी तेथील काही विचारवंत करीत आहे.

# डॉ. जयंत नारळीकर यांना भावपूर्ण निरोप!

## मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची श्रद्धांजली

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ, लेखक, विज्ञानप्रसारक डॉ. जयंत नारळीकर यांचा बुधवारी भावपूर्ण निरोप देण्यात आला. शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आयुका येथे डॉ. नारळीकर यांना श्रद्धांजली वाहिली.**



### मान्यवरांनी श्रद्धांजली

राज्य सरकारच्या वतीने पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी श्रद्धांजली अर्पण केली. पुण्यातील विविध वैज्ञानिक संस्थांतील शास्त्रज्ञ, संशोधक विद्यार्थ्यांनीही डॉ. नारळीकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी 'आयुका'मध्ये गर्दी केली होती.ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, औद्योगिक आणि वैज्ञानिक संशोधन परिषदेचे (सीएसआयआर) माजी महासंचालक डॉ. शेखर मांडे, डॉ. सोमक रायचौधुरी, ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू, रवींद्र शिंगणापूरकर आदी मान्यवरांनी श्रद्धांजली वाहिली.

डॉ.नारळीकर यांचे मंगळवारी पुण्यात निधन झाले.'आयुका'तील भास्कर सभागृहात बुधवारी सकाळी ११ वाजल्यापासून डॉ. नारळीकर यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी डॉ. नारळीकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. तसेच, डॉ. नारळीकर यांच्या कन्या डॉ. गिरीजा आणि डॉ. लीलावती यांच्यासह कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पुणे महापालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा या वेळी उपस्थित होते. राज्य सरकारच्या वतीने पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी श्रद्धांजली अर्पण केली. पुण्यातील विविध वैज्ञानिक संस्थांतील शास्त्रज्ञ, संशोधक विद्यार्थ्यांनीही डॉ. नारळीकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी 'आयुका'मध्ये गर्दी केली होती.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, औद्योगिक आणि वैज्ञानिक संशोधन परिषदेचे (सीएसआयआर) माजी महासंचालक डॉ. शेखर मांडे, 'आयुका'चे संचालक डॉ. आर. श्रीआनंद, माजी संचालक डॉ. सोमक रायचौधुरी, ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू, रवींद्र शिंगणापूरकर आदी मान्यवरांनी श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर वैकुंठ स्मशानभूमी येथे डॉ. नारळीकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.डॉ. नारळीकर यांचे मंगळवारी पुण्यात निधन झाले. 'आयुका'तील भास्कर सभागृहात बुधवारी सकाळी ११ वाजल्यापासून डॉ. नारळीकर यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी डॉ. नारळीकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. तसेच, डॉ. नारळीकर यांच्या कन्या डॉ. गिरीजा आणि डॉ. लीलावती यांच्यासह कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पुणे महापालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा या वेळी उपस्थित होते.

# अजित पवारांनी आम्हाला न्याय मिळवून द्यावा

## वैष्णवी यांचे आई वडील यांनी अजित पवार यांच्याकडे न्याय मागितला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी पक्षाचे नेते राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवी हगवणे यांनी शुक्रवारी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या प्रकरणामध्ये अद्याप ही राजेंद्र हगवणे आणि मुलगा सुशील हे फरार आहेत. शशांक, करिष्मा आणि लता यांना न्यायालयाने २६ मे पर्यंत पोलीस कोठडी पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, वैष्णवी यांचे आई वडील यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे न्याय मागितला आहे. अजित पवारांनी आमच्या मुलीला न्याय मिळवून द्यावा, अस आवाहन वैष्णवी चे वडील अनिल कस्पटे आणि आई स्वाती कस्पटे यांनी केल आहे.**



### हुंड्यात आलेली फॉर्च्यूनर जप्त

वैष्णवीच आणि शशांक चा प्रेम विवाह होता. त्याला आमचा विरोध होता. वैष्णवीला मुलांची दोन स्थळ देखील आली होती. त्या वेळी शशांक ने त्यांना फोन करून आमचं एकमेकांवर प्रेम आहे. अस सांगून तीच जुळणार लग्न मोडलं होत. अखेर दोघांचं लग्न लावून द्यावं लागलं.लग्नात एक फॉर्च्यूनर, ५१ तोळे सोने, ७ किलो चांदीची भांडी, एक दुचाकी दिले होते.

वैष्णवी ला नेहमीच सासरच्या मंडळींनी जाच केला. वारंवार पैशांची मागणी तिचा पती आणि सासरचे मंडळी करत होते. प्रत्येक सणाला पैसे, सोन्याचे दागिने करावे लागायचे. वैष्णवीला पती शशांक मारहाण करायचा. असा आरोप वैष्णवीच्या आई वडिलांनी केला आहे. वैष्णवीच आणि शशांक चा प्रेम विवाह होता. त्याला आमचा विरोध होता. वैष्णवीला मुलांची दोन स्थळ देखील आली होती. त्या वेळी शशांक ने त्यांना फोन करून आमचं एकमेकांवर प्रेम आहे. अस सांगून तीच जुळणार लग्न मोडलं होत. अखेर दोघांचं लग्न लावून द्यावं लागलं.

लग्नात एक फॉर्च्यूनर, ५१ तोळे सोने, ७ किलो चांदीची भांडी, एक दुचाकी दिले होते. या विवाहला अजित पवार हे देखील उपस्थित होते. त्यांच्या हस्ते फॉर्च्यूनर गाडीची चावी शशांकला देण्यात आली होती. तेव्हा, अजित पवारांनी मिश्कीलपणे तू फॉर्च्यूनर मागितली की ते देतायत अस विचारलं होत. अशी माहिती वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे यांनी दिली आहे. आम्हला अजित पवारांनी न्याय मिळवून द्यावा. आमच्या लेकीची हत्या केली आहे. अजित पवारांच्या राज्यात लाडक्या बहिणी आहेत. ही देखील त्यांचीच बहीण होती. अस वैष्णवीची आई स्वाती कस्पटे सांगत असताना अश्रु अनावर झाले. वैष्णवी ला सासरचे व्यक्ती नेहमीच मारहाण करायचे असा गंभीर आरोप ही त्यांनी केला आहे. वैष्णवी च नऊ महिन्याचं बाळ आम्हाला सोपवावे अशी मागणी ही त्यांनी केली आहे.

लवकरात लवकर फरार असलेल्या राजेंद्र हगवणे आणि मुलाला अटक करण्यात यावी अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.हुंड्यामध्ये देण्यात आलेली फॉर्च्यूनर गाडी बावधन पोलिसांनी जप्त केली आहे. वैष्णवीच्या लग्नामध्ये शशांकला अजित पवारांच्या हस्ते या गाडीची चावी देण्यात आली होती. ती गाडी पिंपरी- चिंचवडच्या बावधान पोलिसांनी जप्त केली आहे.वैष्णवी ला नेहमीच सासरच्या मंडळींनी जाच केला. वारंवार पैशांची मागणी तिचा पती आणि सासरचे मंडळी करत होते. प्रत्येक सणाला पैसे, सोन्याचे दागिने करावे लागायचे. वैष्णवीला पती शशांक मारहाण करायचा. असा आरोप वैष्णवीच्या आई वडिलांनी केला आहे.

## आरटीओचे दुर्लक्ष, खासगी बसचे भाडे दामदुपट्ट

# महापालिकेचे कामकाज शंभर टक्के डिजिटल!

## 1 एप्रिल 2025 पासून कागदविरहित कारभार

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने एप्रिल २०२५ पासून कागदविरहित कारभाराकडे यशस्वी वाटचाल सुरू केली असून देशातील आधुनिक व स्मार्ट महानगरपालिका होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. महानगरपालिकेत दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली , कार्यप्रवाह प्रणाली वापरली जात असून, १ एप्रिल २०२५ पासून ३१ हजारांहून जास्त कागदपत्र व ३ हजार ७१६ फाईल्सचे कामकाज डिजिटल पद्धतीने पूर्ण केले आहे.**




> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कोणत्याही विभागात आता फिजिकल पद्धतीने फाईल एका विभागातून दुसऱ्या विभागात पाठवण्याची गरज राहिली नाही. महानगरपालिकेचे संपूर्ण कामकाज डिजिटल स्वरुपात करण्यात आले असून यामुळे प्रशासनातील कामकाजाची गती, पारदर्शकता वाढली आहे. केवळ डिजिटल स्वरुपातील हा बदल नसून तो कार्यक्षमतेचा व विश्वासार्हतेचा प्रतीक आहे. या यंत्रणेमध्ये वापरकर्त्यांच्या अभिप्रायावरून सुधारणा देखील केल्या जात आहेत.
> **-शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

महानगरपालिकेच्या सर्व ५४ विभागांमध्ये आता एकही फाईल्स फिजिकल पद्धतीने तयार केली जात नाही. फाईल्स तयार करण्यासाठी डीएमएस आणि वर्क फ्लो प्रणालीचा वापर केला जात आहे. डीएमएस प्रणालीचा वापर करून सर्व कागदपत्रांचे स्कॅनिंग, ट्रॅकिंग, सामायिकरण व शोध घेणे शक्य झाले आहे. तर, वर्क फ्लो प्रणालीमुळे प्रत्येक फाईलचे कामकाज वेळेत पूर्ण होत असून वेळेची बचत होत आहे.

प्रशासनाचे कामकाज पूर्णतः डिजिटल झाल्यामुळे निर्णयप्रक्रिया, पारदर्शकता व जबाबदारीत लक्षणीय वाढ झाली आहे. या प्रणालींच्या वापरामुळे स्मार्ट प्रशासन, पारदर्शक कामकाज या दिशेने महानगरपालिकेची यशस्वी वाटचाल सुरू असून महानगरपालिकेच्या सेवासुविधा नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचवण्यास देखील मदत होऊ लागली आहे.

पालिकेतील अधिकारी, कर्मचारी यांचे वेतन व ठेकेदारांचे बिले काढण्यासाठी आता सॅप प्रणालीचा वापर केला जात आहे. मार्च व एप्रिलमध्ये ६ हजार ५०० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांचे वेतन व ठेकेदारांचे बिले सॅप प्रणालीद्वारे काढण्यात आली आहेत. याशिवाय, महानगरपालिकेतील अभियांत्रिकी विभागांनी सॅप प्रणालीवर १७६ अंदाजपत्रके तयार केली असून, ही जीआयएस डेटाबेसवर नोंदवली गेली आहेत. ज्यामुळे त्यांचे रिअल-टाइम ट्रॅकिंग शक्य झाले आहे. विवाह नोंदणी, क्रीडा मैदाने व सभागृह बुकिंग, झोपडपट्टी बिलिंग यांसारख्या नागरी सेवा देखील डिजिटल झाल्या आहेत.

---

## इंद्रायणी- पवना संवर्धनासाठी सरकार कटीबद्ध!

## राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांचे आश्वासन; आमदार महेश लांडगे यांची मंत्रालयात बैठक

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पवना आणि इंद्रायणी नदी या पिंपरी-चिंचवड शहराच्या जीवनवाहिन्या आहेत. नदी हे स्वच्छ आणि आरोग्यदायी शहराचे प्रतीक असते. त्यामुळे इंद्रायणी, पवना संवर्धनासाठी सरकार कटीबद्ध असल्याचे आश्वासन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले आहेत. नदी सुधार प्रकल्पाला निधी, पर्यावरण प्रेमी व स्वयंसेवी संस्थांनी नदी सुधार प्रकल्पामध्ये सुचवलेले बदल समाविष्ट करून नवीन डीपीआर करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांनी नदी संवर्धनासाठी एकत्रित आराखडा राबवणे यांसारख्या सूचना आणि नदी सुधार प्रकल्प राज्य सरकारच्या तांत्रिक समितीची प्रशासकीय मान्यता तात्काळ द्यावी, असे निर्देशही नगरविकास विभागाला दिले आहेत.**



पिंपरी-चिंचवड शहराच्या जीवनवाहिनी नदी पवना व इंद्रायणी नदीसुधार प्रकल्पाच्या संदर्भामध्ये विविध मुद्द्यांवर राज्याच्या नगर विकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई, मंत्रालय येथे बुधवारी महत्त्वपूर्ण बैठक झाली.

या बैठकीमध्ये भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पवना आणि इंद्रायणी नदी संवर्धनाबाबत विविध मुद्द्यांवर लक्ष वेधले.

यावेळी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, पर्यावरण विभाग, नगरविकास विभाग आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये आमदार महेश लांडगे यांनी इंद्रायणी व पवना नदी प्रदूषणाकडे लक्ष वेधतानाच या नद्यांसाठी पुनरुज्जीवन प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याचे नमूद केले.


नदीप्रदूषण आणि महापालिकेच्या नदीसुधार प्रकल्पातील त्रुटी याबाबत पुणे व पिंपरी-चिंचवडमधील पर्यावरणप्रेमी आणि स्वयंसेवी संस्था-संघटनांनी गेल्या दोन महिन्यांपासून आंदोलन सुरू केले आहे. पर्यावरणप्रेमींनी सुचविलेले मुद्दे रास्त असून, त्याचा अंतर्भाव नदीसुधार प्रकल्पामध्ये करावा, अशी मागणी लांडगे यांनी केली.

### बैठकीतील प्रमुख मुद्दे...

या बैठकीमध्ये नदी सुधार प्रकल्पाला तांत्रिक मान्यता देणे. केंद्र सरकारच्या एनआरसीडी योजनेअंतर्गत निधी देणे, पर्यावरण प्रेमी व स्वयंसेवी संस्थांनी नदी सुधार प्रकल्पामध्ये सुचवलेले बदल समाविष्ट करून नवीन डीपीआर तयार करणे. पिंपरी महापालिका आणि पीएमआरडीए हद्दीतील नदी प्रदूषणावरती उपाय योजना करणे. या प्रमुख मुद्द्यांबाबत नगर विकास विभागाशी संबंधित प्रलंबित प्रस्ताव तात्काळ मार्गी लावावेत. इंद्रायणी नदीवरील निघोजे तळवडे बंधाऱ्यात ग्रामीण भागातून मिसळणाऱ्या सांडपाण्याबाबत उपाययोजना करावी. मौजे चिखली येथील दफनभूमी आरक्षणामधील 40 टक्के क्षेत्र मैलाशुद्धीकरण केंद्र (STP) वापरासाठी बदल करण्यात यावा. इंद्रायणी व पावना नदी सुधार प्रकल्पासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली कार्य समिती गठीत करण्यात यावी, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

> पवना व इंद्रायणी नदी संवर्धनासाठी प्रशासकीय पातळीवर केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची योग्यरीत्या कार्यवाही व्हावी. राज्य शासनाकडून नदी संवर्धनासाठी तात्काळ निधी प्राप्त व्हावा. तसेच राज्य शासनाकडील परवानग्यांमुळे प्रलंबित कामांची कार्यवाही व्हावी आणि नदी संवर्धन योग्य वेळेत व्हावे यासाठी आम्ही पाठपुरावा करीत आहोत. इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पामध्ये पर्यावरण प्रेमींनी सूचवलेले मुद्दे समाविष्ट करावे आणि सुधारित 'डीपीआर' बनवण्याची मागणी केली असून, त्याला मंत्री महोदय यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. नदी संवर्धन, नदीचे पुनरुज्जीवन आणि शहराचे आरोग्य निरोगी राखण्यासाठी आम्ही नेहमीच प्राथमिकता दिलेली आहे.
> **- महेश लांडगे,** भाजपा, पिंपरी- चिंचवड, पुणे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### अट्टाहासाने नामस्मरण करावे

नामाइतके सूक्ष्म आणि स्थूल साधन नाही. एखादी गोष्ट अगदी कळकळीने सांगायची झाली म्हणजे ‘ अगदी बेंबीच्या देठापासून सांगतो ’ असे आपण म्हणतो. त्याप्रमाणे नामही बेंबीच्या देठापासून घ्यावे, कारण सर्व वासनांचा उगम तिथेच आहे. आपण नामाची वस्ती तिथे ठेवून दिली म्हणजे आपोआप वासनाक्षय होईल. उगीच वरवर नामस्मरण करू नये. ते अट्टाहासाने आणि अंत:करणपूर्वक घ्यावे, यातच खरे हित आहे. आता वासनाच मेली तर आम्ही विषय कसे भोगू, याची नाही काळजी करू. भगवंताची सत्ता जाणली की त्याला सहज जाणता येते. जो जाणेल भगवंत त्याला म्हणावे संत. आपण खेड्यात गेलो की तिथले सभ्य आणि प्रतिष्ठित कोण याची चौकशी करतो. पाटील आम्हाला दिसतो, लोक सांगतात, म्हणून आम्ही त्याची भेट घेऊ शकतो. पण परमात्मा निर्गुण, निराकार, त्याची ओळख कशी करून घ्यावी कळत नाही. आम्हाला कळत नाहीत त्या सर्वच गोष्टी आम्ही कधी खोट्या मानतो का ? आपल्याला असणारी तळमळ ही भगवंताची म्हणजे पूर्णत्वाची तळमळ आहे. नास्तिकाचासुद्धा पूर्णत्वाकडे ओढा असतो. तेव्हा या तळमळीला भगवंत हेच औषध आहे. कोणतीही गोष्ट तळमळीवाचून चांगली होत नाही. प्रत्येक जीवाला तळमळ आहे खरी, पण ती कशासाठी हवी ते चुकले. ती तळमळ विषयाकडे गेल्याने जीवाला खरे समाधान मिळत नाही. आपला जन्म वासनेत होतो, म्हणून वासनातृप्तीची तळमळ स्वाभाविक लागते. तिकडून काढून ती भगवंताकडे लावणे, यात माणसाची खरी कर्तबगारी आहे. काय केले तर मी भगवंताचा होईन, अशी तळमळ लागावी. ती न लागली तर आपले चुकले. वासनेच्या मागे जाणारी तळमळ भगवंताकडे लावण्यासाठीच सगळी साधने आहेत. तळमळ निर्माण झाली की भगवंत हात देतो.

जगामध्ये असे कोणतेही दु:ख नाही, की जे भगवंताच्या आनंदाला विरजण घालील. प्रत्येकाला आनंद पाहिजे आहे, आनंद हेच भगवंताचे स्वरूप आहे. म्हणून मुळामध्ये असलेली गोडी आपण अभ्यासाने वाढवावी. भगवंत जर आपले मूळ स्वरूप आहे, तर मग त्याचा अभ्यास करण्याचे काय प्रयोजन ? तर त्याचे कारण हेच, की आपल्याला भगवंताची विस्मृती झाली आहे. भगवंत हा प्रेममूर्ती आहे, म्हणून मंदिरात जिकडे तिकडे प्रेम भरून टाकावे. दुसरा काय करतो हे न पाहता, आपण काय करायला पाहिजे याचा अगोदर विचार करावा.

**बोधवचन:- भगवंताचे नाम घेणे हे ज्ञान होण्याचेच लक्षण आहे. भगवंताकडे लक्ष लागले की आत्मज्ञान आपोआप होते.**



## ‘स्टेट’मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

# शिष्टमंडळातील खासदारांचा अभ्यास किती? वकूब किती?



**पहलगाम येथे भ्याड दहशतवादी हल्ला झाल्यानंतर भारताने हाती घेतलेल्या ऑपरेशन सिंदूर ला नेत्रदीपक यश मिळाले. पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात भारतीय जवानांना यश आले आणि संपूर्ण जगात भारताची वाहवा झाली. नंतर जगभरात त्याचे पडसाद उमटले.**

### अत्याधुनिक यंत्रणा आणि कुचकामी यंत्रणा..

पाकिस्तानने भारतावर ड्रोन, मिसाईलचे केलेले सर्व हल्ले भारतीय लष्कराने आपल्या आधुनिक अवकाश संरक्षण यंत्रणेने निष्प्रभ केल्याने भारताची फारशी हानी झाली नाही. पण, पाकिस्तानची कुचकामी शस्त्रास्त्रे आणि ती नामशेष करण्यासाठी भारताने वापरलेली आधुनिक तंत्रज्ञानाची युद्धसामग्री, याचा मात्र चांगलाच गाजावाजा झाला.

### दहशतवादाचा बुरखा फाडण्यासाठी !

या घटनाक्रमानंतर जगातील काही देशांना भारताची बाजू समजावून सांगण्यासाठी आणि पाकिस्तानचे दहशतवादी स्वरूप जगासमोर सप्रमाण मांडण्यासाठी भारत सरकारने संसदेतील खासदारांच्या नेतृत्वाखाली काही शिष्टमंडळे देशोदेशी पाठवण्याची घोषणा केली आहे.

### खासदारांचा अभ्यास किती, बोलणार काय?

या शिष्टमंडळांचे नेतृत्व करण्यासाठी निवडलेल्या खासदारांची यादी सरकारने प्रसिद्ध केली. आपल्या देशाची भक्कम बाजू अभ्यासपूर्ण मांडताना, असे शिष्टमंडळ एखाद्या देशात पाठवताना त्याचे नेतृत्व करणाऱ्या नेत्याला आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीचे चांगले आकलन असणे आवश्यक आहे. पाकिस्तानने भारतावर लादलेल्या १९४८, १९६५, १९७१, १९९९ या युद्धांमधे प्रत्येक वेळी पाकिस्तानचा भारतीय लष्कराने पूर्ण पराभव केला. अजून एकदा पाकिस्तानला तोंडावर पाडले, त्यांची लायकी दाखवली, तरी कुरापती काढण्याची आणि युद्धाची त्यांची खुमखुमी जात नाही.

### काश्मीर खोऱ्यात हिंदू नामशेष..

भारताबरोबरच्या उघड युद्धात आपली डाळ शिजत नाही, हे लक्षात घेऊन पाकिस्तानने कट्टर इस्लामी जिहाद्यांना प्रशिक्षित करून त्यांना आश्रय देत भारतात दहशतवादी कारवाया करायला सुरुवात केली. भारताला अस्थिर ठेवणे, हिंसाचार घडवून दहशत निर्माण करणे, हे त्यांचे प्रमुख उद्देश !

### जगातील एकमेव ‘लाईव्ह बॉर्डर’..

भारत - पाकिस्तानची सीमा ही जगातील एकमेव ‘लाईव्ह बॉर्डर’ मानली जाते, जिथे १९४७ पासून आजपर्यंत रोज सरासरी एका भारतीय जवानाचे रक्त सीमेवर सांडले आहे. अशा बुद्धीहीन, कुरापतखोर आणि जागतिक शांततेला सर्वात मोठा धोका असलेल्या पाकिस्तानची दुष्कृत्ये जगाच्या वेशीवर टांगून आता दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असलेल्या पाकिस्तानला आर्थिक आणि लष्करी साहित्याची मदत एकाही देशाने यापुढे देता कामा नये, हे जगाला स्पष्टपणे समजावून सांगणे आवश्यक आहे, त्यासाठी भारताची शिष्टमंडळे निघाली आहेत.

### लादेनही पाकच्या आश्रयाला..

जगात कुठेही इस्लामी किंवा जिहादी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यांचे कट कारस्थान पाकिस्तानातच शिजते, याचे असंख्य पुरावे आहेत. अमेरिकेत वर्ल्ड ट्रेड सेंटर च्या ९/११ च्या हल्ल्यात जे तीन हजारावर अमेरिकन मारले गेले, त्यामागे असलेल्या अल् कायदाचा सूत्रधार ओसमा बिन लादेन याला पाकिस्तानने दहा वर्षे आश्रय दिला, हे लपून राहिलेले नाही.

### आठवा मुंबईवरचा २६/११ चा हल्ला..

मुंबईवर २६/११ ला पाकिस्तानातून आलेल्या दहा दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यामध्ये १६६ निष्पापांच्या बळींनी सगळा भारत आणि जगही हादरले होते. त्याच्या आठवणी तर अजूनही ताज्या आहेत. एवढी काळीकुट्ट कृत्ये निरंतर करीत जगात सर्वत्र निष्पापांच्या हत्या करून अस्थिरता निर्माण करणाऱ्या पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने नुकतेच एक अब्ज डॉलर्सचे कर्ज दिले आहे. यापुढेही ते अशीच मदत करतील अशी शक्यता आहे.

### हा तर संपूर्ण जगाचा शत्रू..

आपला आणि सुसंस्कृत जगाचा सर्वात मोठा शत्रू असलेल्या पाकिस्तानची प्रत्येक पातळीवर कोंडी करून तिथल्या अखेरच्या दहशतवाद्याला संपवणे हाच कार्यक्रम वस्तुतः जगाने हाती घ्यायला हवा. भारताचे त्या दृष्टीने नियोजन दिसत आहे, पण पाकिस्तानच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे काही नादान देश जग उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.

### शिष्टमंडळाला इतिहासाचे आकलन आहे का?

ही धोरणात्मक नीति जगाला समजावून सांगण्यासाठी जी शिष्टमंडळे भारताने पाठवायची ठरवली आहेत, त्यांचे नेतृत्व करणाऱ्या खासदारांना वरील सर्व इतिहासाचे आकलन आहे का ? त्यांनी कधी संसदेत या विषयावर अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे का ? भारताने सध्या स्थगिती दिलेल्या सिंधू जल वाटप कराराचे आकलन या खासदारांना खरोखर आहे का ?

### पूर्वीचे करार अभ्यासले आहेत का?

याव्यतिरिक्त भारत आणि पाकिस्तान यांच्या दरम्यानचा व्यापार, पूर्वी झालेले करार आणि सध्याची वस्तुस्थिती याचा सखोल अभ्यास आहे का? दहशतवादाचे जे दुष्परिणाम जगाच्या अर्थकारणावर होतात, निष्पापांच्या निर्घृण हत्यांमागे एखादा सूत्रबद्ध विचार आणि तो अमलात आणणारी संघटित व्यवस्था असेल तर त्याचा जागतिक शांततेवर किती गंभीर परिणाम होतो, याबद्दल आपल्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करणाऱ्या खासदारांना कधी मूलभूत अभ्यास करून संसदेत ती मांडणी करताना आपण पाहिले आहे का ?

### गुणवत्तेचे कोणते निकष?

या नेत्यांची निवड करताना गुणवत्तेचे कोणते निकष आपल्यासमोर आहेत ? ही मंडळी ज्या देशात जातील, तेथील मीडियातील प्रतिनिधी जेव्हा यांना खोचक प्रश्न विचारतील, प्रत्येक घटनेच्या ऐतिहासिक माहितीबद्दल एखादा प्रश्न विचारतील, पुरावे मागतील, तेव्हा यांचे कोरे करकरीत चेहरे जगाचा मीडिया टिपेल, याचा भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेवर काय परिणाम होईल, याचा अभ्यास झाला आहे का ?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ‘जल जीवन मिशन’ 90 टक्के ‘डन’




**‘जल जीवन मिशन’ ही केंद्र सरकारची एक प्रमुख योजना आहे. ‘हर घर, सुरक्षित जल’ अशी घोषणा देऊन, २०२४ पर्यंत १०० टक्के कार्यात्मक घरगुती नळ कनेक्शन (एफएचटीसी) प्रदान करण्यासाठी २०१९ मध्ये ‘जल जीवन मिशन’ सुरू करण्यात आले.**

पण ‘नळजोडणी’, नळाच्या पाण्याची उपलब्धता आणि वापर यांमध्ये मोठी तफावत आहे, हे या योजनेपुढले खरे मोठे आव्हान. ग्रामीण भागातील फक्त ३९ टक्के कुटुंबे, पाण्याचा प्राथमिक स्रोत म्हणून नळांचा वापरू शकतात (आकडेवारी २०२२-२३ मधील राष्ट्रीय नमुना पाहणी- ७९ची ). शिवाय, नळाच्या पाण्याचा वापर वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये मोठ्या प्रमाणात भिन्न आहे. उत्तर प्रदेश, झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल आणि ओडिशा यांसारख्या राज्यांमध्ये नळाच्या पाण्याचा वापर खूपच कमी – म्हणजे फक्त सहा टक्क्यांपासून ते फारतर ३० टक्क्यांपर्यंत आहे. नळाच्या पाण्याची उपलब्धता आणि वापर यांतील तफावत जर इतकी असेल, तर ‘जल जीवन मिशन’ कार्यक्षम आहे असे कसे म्हणता येईल?कार्यक्षमतेपुढे आव्हाने आहेतच, आणि त्यांतील काही आव्हाने सरकारच्याच निर्णयांमुळे निर्माण झालेली किंवा संरचनात्मक आहेत. ‘इंडियन एक्स्प्रेस’ सारख्या वृत्तपत्रांनी याविषयी सरकारी निर्णयांच्या बातम्याही वेळोवेळी दिल्या आहेत. त्यातून केंद्र सरकारकडून आर्थिक मदतीमध्ये कपात, राज्य पातळीवर नोकरशाही



अनियमितता आणि या योजनेच्या पायाभूत सुविधांच्या बांधकामात घोटाळेसुद्धा झाल्याचे दिसून येते. त्यामुळे जेजेएमची प्रगती मंदावली आहे. आर्थिक भार वाढतोच आहे पण पायाभूत सुविधा अपूर्ण आहेत, अशी स्थिती येण्याचे मोठे कारण म्हणजे निविदांच्या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव. या समस्यां सोडवसाठी केंद्र, राज्य आणि स्थानिक सरकारांकडून विचारविनिमय आवश्यक असला तरी, दैनंदिन जीवनात नळ-पाण्याच्या पायाभूत सुविधा कशा चालवल्या जातात – म्हणजे त्यांचे व्यवस्थापन कसे केले जाते, यावरच बरेच काही अवलंबून आहे. नाहीतर ‘नळ आहे, पण पाणी नळाचे नाही’ ही स्थिती कायम राहील. व्यवस्थापनाच्या पातळीवरल्या काही प्रमुख चिंता जशा तांत्रिक आहेत तशाच त्या नोकरशाहीशी संबंधित आहेत. त्यांकडे त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी डिझाइन, ऑपरेशन, मानके, प्रक्रिया, मॅन्युअल, निकष आणि मार्गदर्शक तत्त्वे हे सारे केंद्रीय पातळीवरील संस्थांनी बनवलेले होते आणि प्रादेशिक किंवा स्थानिक-स्तरीय संस्थांनी त्यांचे पालन करायचे, अशी अपेक्षात होती. जगातल्या अन्य देशांनी याच काळात विकेंद्रित आणि समुदाय-चालित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि, आपल्याला अद्याप विकेंद्रित यंत्रणा साध्य झालेली नाही. नळ पाणी पुरवठ्याचे व्यवस्थापन करणाऱ्या स्थानिक संस्था आणि घटकांची आर्थिक आणि तांत्रिक स्वायत्तता आपल्याकडे जवळपास नाहीच. त्यामुळे, नळ बसवताना या संस्थांना कोणत्या सामाजिक आणि स्थानिक आव्हानांना तोंड द्यावे लागते आणि पाण्याची गुणवत्ता आणि प्रमाण व्यवस्थापित करण्यासाठी आणि वेळेवर पुरवठा करण्यासाठी त्या तांत्रिकदृष्ट्या सुसज्ज आहेत का याकडे सर्वप्रथम लक्ष देणे आवश्यक आहे. पाणी पुरवठ्याविषयीच्या तक्रारींची तात्काळ दखल घेऊन त्यांचे निवारण करण्यासाठी यंत्रणा बळकट करण्याची नितांत गरज आहे. स्थानिक पातळीवरील घटकांकडून किती तक्रारी प्राप्त होतात आणि त्यांचे निराकरण होते याबद्दल कोणतीही आकडेवारीच आजघडीला उपलब्ध नाही. आणखी एक महत्त्वाची चिंता अशी आहे की प्रशासकीय पातळीवरील आकडेवारी जमिनीवरील वास्तवापासून फारच दूर आहे. ‘जल जीवन मिशन’ची इत्थंभूत माहिती एका क्लिकवर मिळण्यासाठी संकेतस्थळावर डॅशबोर्ड उपलब्ध असल्याचा दावा केला जातो. तो डॅशबोर्ड आहे खरा, पण त्यात अनेक गावे आणि प्रदेशांसाठी १०० टक्के नळाच्या पाण्याची उपलब्धता दाखवली जाते आणि प्रत्यक्षातली परिस्थिती तशी नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे नळाच्या पाण्याची उपलब्धता मोजण्यासाठी त्यांनी जुन्याच जनगणचेचा आधार घेतलेला आहे.पण ‘नळजोडणी’, नळाच्या पाण्याची उपलब्धता वाय, नळाच्या पाण्याचा वापर वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये मोठ्या प्रमाणात भिन्न आहे. नळाच्या पाण्याचा वापर खूपच कमी – म्हणजे फक्त सहा टक्क्यांपासून ते फारतर ३० टक्क्यांपर्यंत आहे.

## प्रासंगिक »

### सौदीघरचा सौदागर!

***अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकताच पश्चिम आशियाचा दौरा केला.***

पश्चिम आशिया म्हणजे सौदी अरेबिया, कतार आणि संयुक्त अरब अमिराती. एरवी अमेरिकेचा कोणताही अध्यक्ष या भागात आला की इस्रायलला सरळवाटेने किंवा वाट वाकडी करून तरी भेट देतोच. ट्रम्प यांचा हा आखाती दौरा त्यादृष्टीने अभूतपूर्व. कारण ते इस्रायलकडे फिरकलेदेखील नाहीत! अमेरिकेच्या दृष्टीने इस्रायल हा प्राधान्याचा मुद्दा तितका राहिलेला नाही, हे यातून स्पष्ट होते. रियाध ते दोहा ते अबूधाबी असा दौरा करून ट्रम्प मायदेशी परतले, ते खंडीभर सौदे करूनच. या काळात सीरियावरील निर्बंध हटवणे नि हुथी बंडखोरांशी करार ही क्रांतिकारी पावले ठरली. इस्रायल-हमास संघर्ष, इराण अणुकरार हे मुद्दे त्यांच्या भेटीपश्चातही धुमसत आहेत. या व जगभरातील अशा युद्धनिखाऱ्यांवर व्यापारी सौद्यांचे पाणी ओतून ते विझविण्याचा प्रयत्न ट्रम्प यापुढेही करत राहणार हे नक्की.

जगभर मधमाशीपालनाला प्रोत्साहन दिले जात आहे, मात्र महाराष्ट्रात अनुकूल परिस्थिती असूनही मध उत्पादन एकूण क्षमतेच्या केवळ सात टक्केच होते. ही स्थिती बदलण्यासाठी विविध विभागांच्या समन्वयातून राज्याचे एकात्मिक मध धोरण तयार करणे गरजेचे आहे. जागतिक मधमाशी दिनानिमित्त मधमाशी संवर्धनातील आव्हानांविषयी...

# मधक्रांतीसाठी एकात्मिक धोरण अपरिहार्य!

जैवविविधता टिकवून ठेवण्यात मधमाश्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. मधमाश्यांमुळे पर्यावरणाचे संतुलन तर टिकून राहतेच, परंतु जगातील एक लाखापेक्षा जास्त वनस्पतींना फलोत्पादनासाठी मधमाश्या अनिवार्य आहेत. गहू, भात, मूग, उडीद, वांगी, मिरची, वाटाणा यासारखा २० टक्के वनस्पती व पिकांचा अपवाद सोडला तर ८० टक्के सपुष्प वनस्पतींना परपरागीभवनाची आवश्यकता असते. यांत सूर्यफूल, मका, बाजरी, मोहरी, मुळा, संत्र, मोसंबी, डाळिंब, पेरू, पपईचा समावेश आहे. मधमाशीपासून मध, मेण, परागकण, मधमाशीचे विष, रॉयल जेली, प्रोपोलिस हे पदार्थ मिळतात. परंतु त्यापेक्षा मधमाश्यांचा पिके व फळांच्या परागीभवनासाठी होणारा उपयोग अधिक मोलाचा.मधमाशीपालन हा कृषीस उपयुक्त जोडव्यवसाय आहे. अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर, आदिवासी आदी दुर्बल घटकांसाठी हा महत्त्वपूर्ण व्यवसाय आहे. जागतिक



पातळीवर आज मधमाशीपालनावर मोठे कार्य केले जात आहे. कमी भांडवल लागणारा, प्रदूषण न करणारा, अन्नधान्यांचे उत्पादन वाढविणारा, विविध उपउत्पादने देणारा व रोजगार निर्माण करणारा हा एक आदर्श उद्योग व्यवसाय आहे. मध उत्पादनात चीन, तुर्कस्तान, इराण, अमेरिका, अर्जेंटिना, भारत हे देश पुढे आहेत. उपलब्ध आकडेवारीप्रमाणे भारतामध्ये चीनपेक्षा मधमाश्यांच्या अधिक वसाहती आहेत, मात्र मध उत्पादनात चीन भारताच्या पुढे आहे. चीनमध्ये वसाहती आहेत एक कोटी अठरा लाख आणि मध उत्पादन ४,८६,००० टन. भारतात वसाहती आहेत २ कोटींच्या आसपास पण मध उत्पादन १,३३,२०० टन. उत्तर प्रदेश, प. बंगाल, पंजाब, बिहार, राजस्थान मध उत्पादनात अग्रेसर आहेत. परंतु महाराष्ट्र पहिल्या दहामध्येसुद्धा नाही. कृषिक्रांतीत महाराष्ट्राने अग्रेसर भूमिका बजावली आहे, परंतु मधमाशीपालनात मात्र महाराष्ट्र पिछाडीवर आहे.महाराष्ट्रात तृणधान्ये वगळली तर उर्वरित पिके ही परागीभवनासाठी मधमाश्यांवर मुख्यत्वे अवलंबून असतात. मधमाशीपालनासाठी येथे अनुकूल परिस्थिती आहे, परंतु मध उत्पादन मात्र एकूण क्षमतेच्या केवळ सात टक्के होते. महाबळेश्वर येथे राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे मध संचालनालय व पुणे येथे खादी व ग्रामोद्योग आयोगाची केंद्रीय मधुमक्षिका संस्था आहेत. दोन अग्रगण्य संस्था असूनदेखील येथे मधाचे दर्जेदार व अपेक्षित उत्पादन नाही. राज्यात आज ४४ हजार गावांपैकी केवळ दोन हजार गावांमध्ये मधमाशीपालन केले. जाते. इस्रायलसारख्या लहान देशात मधमाश्यांच्या वसाहती आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सातारा जिल्ह्यात पावसाचा धुमाकूळ!

## साताऱ्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सातारा शहरासह जिल्ह्यात पावसाने सलग दुसऱ्या दिवशी धुमाकूळ घातला. या मुळे शहरातील रस्त्यांना नदी-नाल्याचे स्वरूप आले होते. साताऱ्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. नगरपालिका प्रशासनाने गटार नाल्यांची स्वच्छता न केल्याने अनेक ठिकाणी घरे, दुकानात पावसाचे पाणी शिरले. यामुळे गोळीबार मैदान, गोडोली, गोडोली नाका साईबाबा मंदिर, ढोणे कॉलनी, माची पेठ परिसरात मोठे नुकसान झाले. शहरासह वेगवेगळ्या ठिकाणी वळवाच्या पावसाचा जोरदार तडाखा बसला. जोरदार पावसाने सातारकरांची दैना उडाली..**

शहराच्या अनेक भागांत पाणी साचणे, वीजपुरवठा खंडित होणे, वाहतूक कोंडी हे पावसाळ्यात दिसणारे नियमित चित्र यंदा पूर्वमौसमी पावसाने दाखवले. पुढील दोन-तीन दिवस दुपारनंतर ढगांचा गडगडाट, वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. शहरातील गोडोली, साईबाबा मंदिर परिसरात पाणी घरात आणि दुकानात घुसून लाखोंचे नुकसान झाले. पालवी चौकातील भैरवनाथ सोसायटीमध्ये काही घरांमध्ये पाणी घुसण्याचे प्रकार घडले. सदर बाजार येथील कुरेशी गल्लीमध्ये घरांमध्ये पाणी शिरून दलदल तयार झाली.सातारा पालिकेने आपत्कालीन परिस्थितीसाठी २५ कर्मचाऱ्यांचे पथक तैनात केले असून त्यांना युद्धपातळीवर कामे नेमून देण्यात आलेली आहेत. प्राधान्यक्रमाने साताऱ्यातील सात ओढ्यांची स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. ज्या ठिकाणी पाणी साचून राहत आहे ते पाणी हटवणे हे काम सध्या प्रगतिपथावर आहे. विसावा नाका (बॉम्बे रेस्टॉरंट चौका) मध्ये रस्त्याचा समतोलपणा हरवल्याने पाणी साचून राहत आहे.मंगळवारी रात्री वादळी वाऱ्याने कास यवतेश्वर रस्त्यावरील मोबाइल टॉवर कोसळला. या टॉवरखाली पाच गाड्यांचे मोठे नुकसान झाले. दोन जण जखमी झाले. मोबाइल टॉवर कोसळल्याने यवतेश्वर कास रस्ता तीन किलोमीटरपर्यंत ठप्प झाला. वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या. पोलिसांकडून वाहतूक सुरळीत करण्याचे काम सुरू होते. मुसळधार स्वरूपात पडणाऱ्या या पावसामुळे सातारकरांना अक्षरशः भयभीत करून सोडले. शहरात पोवई नाक्यावर पाणी साचले. त्यामुळे वाहनधारकांची त्रेधा उडाली. ग्रामीण भागात ओढ्यानाल्यांतून पाणी वाहिले. सखल भागात पाणी साचले. सायंकाळनंतर अनेक भागांमध्ये वीजपुरवठा खंडित झाल्याने सातारा शहर अंधारात होते. सातारा जिल्ह्यामध्ये एकूण ३३.४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. सातारा सदर बाजार येथे कारवर भिंत कोसळली. बुधवारी सकाळपासूनच शहरासह जिल्ह्याच्या वेगवेगळ्या भागांमध्ये जोरदार पाऊस झाला. माण तालुक्यामध्ये वीरकर वस्ती येथे झाड कोसळून गायीचा मृत्यू झाला. तर मार्डी येथे डाळिंब पिकाचे नुकसान झाले.वादळी वाऱ्याने आंबा पीक गळून पडले. शहराच्या अनेक भागांत पाणी साचणे, वीजपुरवठा खंडित होणे, वाहतूक कोंडी हे पावसाळ्यात दिसणारे नियमित चित्र यंदा पूर्वमौसमी पावसाने दाखवले. पुढील दोन-तीन दिवस दुपारनंतर ढगांचा गडगडाट, वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. शहरातील गोडोली.

### सलग सहा दिवस पाऊस

साईबाबा मंदिर परिसरात पाणी घरात आणि दुकानात घुसून लाखोंचे नुकसान झाले. पालवी चौकातील भैरवनाथ सोसायटीमध्ये काही घरांमध्ये पाणी घुसण्याचे प्रकार घडले. सदर बाजार येथील कुरेशी गल्लीमध्ये घरांमध्ये पाणी शिरून दलदल तयार झाली. भवानी पेठ येथे राजलक्ष्मी थिएटरच्या पिछाडीला एका ठिकाणी संरक्षण भिंत कोसळून नुकसान झाले.सातारा पालिकेने आपत्कालीन परिस्थितीसाठी २५ कर्मचाऱ्यांचे पथक तैनात केले असून त्यांना युद्धपातळीवर कामे नेमून देण्यात आलेली आहेत. प्राधान्यक्रमाने साताऱ्यातील सात ओढ्यांची स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. ज्या ठिकाणी पाणी साचून राहत आहे ते पाणी हटवणे हे काम सध्या प्रगतिपथावर आहे.

---

# काँग्रेस माजी आमदारांच्या भाजपा प्रवेशाची चर्चा

## केंद्रीय गृहमंत्र्यांच्या नांदेड दौऱ्यातील कार्यक्रमांची तयारी सुरु



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भाजपा नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या आगामी नांदेड दौऱ्यातील पक्षप्रवेशासाठी नांदेडपासून परभणी, जालन्यापर्यंत जाळे फेकण्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे. नांदेड जिल्ह्यातील काँग्रेसच्या एका माजी आमदाराच्या भाजपा प्रवेशाची चर्चा सुरू आहे; पण भाजपाच्या वाटेवर समजले जाणारे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम बुधवारी पक्ष कार्यालयात झालेल्या कार्यक्रमास हजर असल्याचे दिसले.**

केंद्रीय गृहमंत्र्यांच्या येत्या २६ तारखेच्या नांदेड दौऱ्याची खासदार अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जय्यत तयारी चाललेली असताना या दौऱ्यातील एका मोठ्या कार्यक्रमात काँग्रेसचे मराठवाड्यातील काही माजी आमदार भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर चव्हाण यांचे निकटवर्ती, माजी राज्यमंत्री डी. पी. सावंत यांच्याकडे आज थेट विचारणा केली असता त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. गेल्या विधानसभा निवडणुकीनंतर मला भाजपाचे उपरणे घालण्यात आले होते.

त्यानंतर आता जाहीर प्रवेश करण्याची गरज नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. परभणी आणि जालना जिल्ह्यातील काँग्रेसचे दोन माजी आमदार अमित शहा यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश घेऊ शकतात, अशी चर्चा येथे होत आहे.संभाव्य नावांमध्ये कंधारचे माजी आमदार ईश्वरराव भोसीकर यांचीही नाव घेण्यात येत आहे. त्यांच्याशी संपर्क साधला असता भाजपा प्रवेशासंदर्भात आपल्याकडे कोणी संपर्क साधला नाही आणि आता पक्ष बदलण्याचाही विषय नाही, असे त्यांनी सांगितले.खासदार चव्हाण यांनी गेल्या सोमवारी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बी.आर.कदम यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्याशी प्रदीर्घ कालावधीनंतर सविस्तर चर्चा केली. या भेटीनंतर कदम यांच्या भाजपा प्रवेशाच्या बातम्या माध्यमांमध्ये प्रकाशित झाल्या. त्यावर त्यांनी कुठलाही खुलासा नंतर केला नाही.

### भाजपात बैठकांचा धडाका

पण माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतीदिनानिमित्त बुधवारी सकाळी काँग्रेसच्या जिल्हा कार्यालयात झालेल्या अभिवादन सभेस कदम उपस्थित होते. पक्षाच्या नियोजित कार्यक्रमविषयक चर्चेमध्ये त्यांनी भागही घेतल्याचे सांगण्यात आले.केंद्रीय गृहमंत्र्यांच्या दौऱ्याच्या निमित्ताने खा.अशोक चव्हाण यांनी मागील दोन दिवसांपासून वेगवेगळ्या बैठकांचा धडाका सुरू केला आहे. मंगळवारी दुपारी त्यांनी उत्तर जिल्हा भाजपाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली.

बुधवारी दुपारी शंकरस्मृती इमारतीतील सभागृहामध्येही एक व्यापक बैठक घेण्यात आल्याचे दिसून आले. अमित शहा यांच्या नियोजित दौऱ्यातील कार्यक्रमांचा तपशील अद्याप उघड करण्यात आलेला नाही. पण या दौऱ्यात ते खासदार चव्हाण यांच्या निवासस्थानी भेट देणार आहेत.

# पाकिस्तानात सिंधू पाणी प्रश्न पेटला!

## थेट गृहमंत्र्यांचं घर पेटवलं, बलुचिस्तानपाठोपाठ सिंधमध्ये दहशत

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पाकिस्तान सध्या चोहोबाजूंनी अडचणींचा सामना करतोय. देशाची आर्थिक स्थिती ढासळली आहे, बलुचिस्तानमध्ये अस्थिर वातावरण निर्माण झालं आहे, सीमेवर भारताबरोबर संघर्ष चालू आहे आणि आता सिंध प्रांतातही तणाव निर्माण झाला आहे. सिंधमधील जनता सिंधू नदीवरील वादग्रस्त सहा कालव्यांच्या प्रकल्पाविरुद्ध रस्त्यावर उतरली आहे. गेल्या काही दिवसांपासून सिंधमधील लोक निदर्शने करत आहेत. मंगळवारी, या आंदोलनाने हिंसक वळणं घेतलं. आंदोलकांनी सिंध प्रांताचे गृहमंत्री झियाउल हसन लंजर यांच्या नौशहरो फिरोज जिल्ह्यातील बंगल्यावर हल्ला चढवला आणि आग लावली.**



आंदोलकांनी राष्ट्रीय महामार्गानजिक मोरो शहरातील मंत्र्यांच्या निवासस्थानावर हल्ला केला. तसेच बंगल्याबाहेरच्या रस्त्यावर उभे असलेले दोन ट्रेलर (मोठी मालवाहू वाहने) पेटवले. यावेळी पोलिसांनी आंदोलकांवर लाठीहल्ला केला. पोलिसांच्या हल्ल्यात दोन आंदोलकांचा मृत्यू झाला असून डझनभर लोक जखमी झाले आहेत. तसेच पोलीस उप-अधीक्षकांसह सहा पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. चोलिस्तान कालव्याचा मुद्दा खूप तापला आहे. सिंधमधील सत्ताधारी पाकिस्तान पीपल्स पार्टी (पीपीपी) आणि केंद्रातील शाहबाज शरीफ सरकारमध्ये या कालव्यावरून मोठा संघर्ष चालू आहे. चोलिस्तानातील वाळवंटातील मोठं क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी शाहबाज शरीफ सरकारने सिंधू नदीवर सहा कालवे बांधण्याची योजना आखली आहे. शरीफ सरकारचा हा महत्त्वकांक्षी प्रकल्प पुढे रेटण्याचा केंद्राचा प्रयत्न आहे. मात्र, सिंधमधील नागरिक, पीपीपीचे कार्यकर्ते याविरोधात रस्त्यावर उतरले आहेत. इतरही लहानमोठे पक्ष या प्रकल्पाविरोधात निदर्शने करत आहेत.दरम्यान, आज आंदोलनाने हिंसक वळण घेतलं. आंदोलक मोरो शहरांत निदर्शने करत होते. येथील राष्ट्रीय महामार्गानजिक गृहमंत्र्यांचं घर आहे. यावेळी पोलीस व आंदोलकांमध्ये बाचाबाची झाली.ज्यामुळे पोलिसांनी थेट आंदोलकांवर लाठीहल्ला सुरू केला. आंदोलकांनीही पोलिसांवर दगडफेक करत प्रत्युत्तर दिलं. आंदोलकांनी पोलिसांसह गृहमंत्र्यांच्या बंगल्यावर हल्ला चढवला, पोलिसांची वाहने पेटवली, मंत्र्यांचं घरही पेटवलं.पाकिस्तानी सरकारने दिलेल्या माहितीनुसार चोलिस्तान कालवा प्रकल्पासाठी ७८३ दशलक्ष डॉलर्स (२,२०६ कोटी पाकिस्तानी रुपये) इतका खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पामुळे शेकडो एकर जमीन शेतीयोग्य होईल, असा सरकारचा दावा आहे. याद्वारे शेतीतून मोठं उत्पादन घेता येईल असं सरकारचं म्हणणं आहे. परंतु, सिंध प्रांतातील लोकांचा त्यास विरोध आहे. शहरातील मंत्र्यांच्या निवासस्थानावर हल्ला केला. तसेच बंगल्याबाहेरच्या रस्त्यावर उभे असलेले दोन ट्रेलर (मोठी मालवाहू वाहने) पेटवले. यावेळी पोलिसांनी आंदोलकांवर लाठीहल्ला केला. पोलिसांच्या हल्ल्यात दोन आंदोलकांचा मृत्यू झाला असून डझनभर लोक जखमी झाले आहेत. तसेच पोलीस उप-अधीक्षकांसह सहा पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. चोलिस्तान कालव्याचा मुद्दा खूप तापला आहे. सिंधमधील सत्ताधारी पाकिस्तान पीपल्स पार्टी (पीपीपी) आणि केंद्रातील शाहबाज शरीफ सरकारमध्ये या कालव्यावरून मोठा संघर्ष चालू आहे. चोलिस्तानातील वाळवंटातील मोठं क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी शाहबाज शरीफ सरकारने सिंधू नदीवर सहा कालवे बांधण्याची योजना आखली आहे.

### पोलिसांची वाहने पेटवली

शरीफ सरकारचा हा महत्त्वकांक्षी प्रकल्प पुढे रेटण्याचा केंद्राचा प्रयत्न आहे. मात्र, सिंधमधील नागरिक, पीपीपीचे कार्यकर्ते याविरोधात रस्त्यावर उतरले आहेत. इतरही लहानमोठे पक्ष या प्रकल्पाविरोधात निदर्शने करत आहेत.दरम्यान, आज आंदोलनाने हिंसक वळण घेतलं. आंदोलक मोरो शहरांत निदर्शने करत होते. येथील राष्ट्रीय महामार्गानजिक गृहमंत्र्यांचं घर आहे. यावेळी पोलीस व आंदोलकांमध्ये बाचाबाची झाली. ज्यामुळे पोलिसांनी थेट आंदोलकांवर लाठीहल्ला सुरू केला. आंदोलकांनीही पोलिसांवर दगडफेक करत प्रत्युत्तर दिलं. आंदोलकांनी पोलिसांसह गृहमंत्र्यांच्या बंगल्यावर हल्ला चढवला, पोलिसांची वाहने पेटवली.

# पाठिंबा दर्शवणाऱ्या तालिबानने भूमिका बदलली

## चीनमध्ये पाकिस्तानशी चर्चा, बीजिंगमधील बैठकीत घेतला निर्णय

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारतासोबत उभ्या राहिलेल्या तालिबान सरकारला आता चीन आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहे. भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी काही दिवसांपूर्वी तालिबानचे कार्यवाहक परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांच्याशी अफगाणिस्तानच्या तालिबान प्रशासनाशी भारतातर्फे पहिली अधिकृत मंत्रीस्तरीय चर्चा केली होती. यानंतर चीनने पाकिस्तान आणि तालिबान यांच्यात बैठक आयोजित करण्यासाठी वेगाने हालचाल केली.**



बुधवारी चीन-पाकिस्तान आणि अफगाणिस्तानने एक मोठा निर्णय घेतला असून, तिन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर अफगाणिस्तानपर्यंत विस्तारित करण्यास संयुक्तपणे सहमती दर्शविली आहे. चीनची राजधानी बीजिंगमध्ये झालेल्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली.या बैठकीला पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री इशाक दार, चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी आणि अफगाणिस्तानचे कार्यवाहक परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्ताकी उपस्थित होते. दरम्यान भारत चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरला सातत्याने विरोध केला आहे. कारण हा कॉरिडॉर पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधून जातो.चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी बीजिंगमधील पत्रकार परिषदेत चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी, पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार आणि अफगाणिस्तानचे कार्यवाहक परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांच्यातील बैठक अनौपचारिक असल्याचे म्हटले आहे. या त्रिपक्षीय बैठकीबद्दल, चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, चीन अफगाणिस्तान आणि पाकिस्तानला त्यांच्या सार्वभौमत्वाचे, सुरक्षिततेचे आणि राष्ट्रीय प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी पाठिंबा देत आहे.चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरला प्रकल्पात तिसऱ्या देशाच्या सहभागाला प्रोत्साहन दिल्याबद्दल भारताने यापूर्वी चीन आणि पाकिस्तानचा तीव्र निषेध केला आहे.

### आर्थिक कॉरिडॉरला भारताचा विरोध

परराष्ट्र मंत्रालयाने २०२२ मध्ये म्हटले होते की, "आम्ही तथाकथित चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर प्रकल्पांमध्ये तिसऱ्या देशांच्या प्रस्तावित सहभागाला प्रोत्साहन देणारे अहवाल पाहिले आहेत. कोणत्याही पक्षाने केलेली अशी कोणतीही कृती भारताच्या सार्वभौमत्वाचे आणि प्रादेशिक अखंडतेचे थेट उल्लंघन करते. भारत तथाकथित चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरला प्रकल्पाला तीव्र आणि सातत्याने विरोध करतो, जो पाकिस्तानने बेकायदेशीरपणे व्यापलेल्या भारतीय हद्दीतून जातो.दरम्यान, चीन आणि पाकिस्तानने या प्रकल्पात अफगाणिस्तानचा समावेश अशा वेळी केला आहे जेव्हा तालिबान सरकारने पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध करत ऑपरेशन सिंदूरला पाठिंबा दिला आहे.

# १८ व्या वर्षी सुश्मिता झाली मिस युनिव्हर्स

सुश्मिता सेन भारताची पहिली 'मिस युनिव्हर्स' म्हणून ओळखली जाते. २१ मे १९९४ मध्ये वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी अभिनेत्रीने 'मिस युनिव्हर्स'चा खिताब जिंकला होता. आज या गोष्टीला तब्बल ३१ वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने सुश्मिताने तिच्या इन्स्टाग्रावर अकाऊंटद्वारे मिस युनिव्हर्स स्पर्धेदरम्यानचे काही फोटो शेअर करत जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे. सुश्मिता सेनने १९९६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'दस्तक' चित्रपटातून बॉलीवूडमध्ये एन्ट्री घेतली होती. यानंतर सुश्मिताने 'मैं हू ना', 'बीवी नंबर १', 'मैने प्यार क्यू किया?' अशा गाजलेल्या चित्रपटांमध्ये काम करून प्रत्येकाचं मन जिंकून घेतलं. सुश्मिताचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. सौंदर्य स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या अनेक तरुणी सुश्मिताला आपला आदर्श मानतात. सुश्मिता सेन ही भारताची पहिली 'मिस युनिव्हर्स' आहे. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत अभिनेत्रीला नेमका कोणता प्रश्न विचारण्यात होता, त्यावर सुश्मिताने काय उत्तर दिलं. याबद्दल जाणून घेऊयात... सध्या सुश्मिताने 'मिस युनिव्हर्स' स्पर्धेत दिलेल्या उत्तराचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.आज सुश्मिताला मिस युनिव्हर्सचा खिताब जिंकून ३१ वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने खास पोस्ट शेअर करून अभिनेत्रीने भावना व्यक्त केल्या आहेत. "१८ वर्षांच्या मुलीला संपूर्ण विश्वाशी ओळख करून देणारा ऐतिहासिक दिवस" असं अभिनेत्रीने पोस्टच्या कॅप्शनमध्ये म्हटलं आहे. "एका स्त्रीकडे पाहण्याचा तुझा दृष्टीकोन आणि स्त्री असण्याचं सार काय आहे? यावर अभिनेत्री म्हणाली होती, "स्त्री म्हणून जन्माला येणं...आपलं स्त्रीत्व ही देवाने दिलेली खूप मोठी देणगी आहे. स्त्री बाळाला जन्म देते. घरातील पुरुषांना अनेक गोष्टी शिकवते...कुटुंबाची काळजी घेते. घरातील स्त्री प्रत्येक गोष्ट करू शकते...आणि हेच स्त्री असण्याचं सार आहे."दरम्यान, 'मिस युनिव्हर्स'मध्ये सहभागी होण्यापूर्वी देशांतर्गत झालेल्या 'मिस इंडिया' स्पर्धेत सुश्मिताला, "जर तुम्हाला एखादी ऐतिहासिक घटना बदलायची असेल तर ती काय असेल?" हा प्रश्न विचारण्यात आला होता.

# 'हेरा फेरी 3' एक्झिटवर सुनील शेट्टी यांची प्रतिक्रिया



'हेरा फेरी ३' हा चित्रपट काही दिवसांपासून चर्चेत आहे. त्यामागचे कारण आहे अभिनेते परेश रावल यांनी 'हेरा फेरी ३'मधून घेतलेली एक्झिट. परेश रावल यांनी ते 'हेरा फेरी ३' चित्रपटात बाबू भय्या ही गाजलेली भूमिका साकारणार नसल्याचे जाहीर केले आहे. त्याबाबत त्यांनी पूर्वी माध्यमांना दिलेल्या मुलाखतींमधून सांगितले होते. त्यानंतर अक्षय कुमारने त्यांना पूर्वकल्पना न देता, अचानक चित्रपटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याने २५ कोटींची नोटीस पाठवली असल्याचे वृत्त समोर आले आहे. अद्याप यावर अजून अक्षय कुमार किंवा परेश रावल यांनी प्रतिक्रिया दिलेली नाही. 'हेरा फेरी ३' चित्रपटाचे दिग्दर्शक प्रियदर्शन यांनी 'हिंदुस्तान टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये यावर प्रतिक्रिया दिली होती. ते म्हणाले, "मला माहीत नाही, असं का झालं? कारण परेशनं याबाबत आम्हाला पूर्वकल्पना दिली नव्हती." आता यावर अशाच स्वरूपाची प्रतिक्रिया या चित्रपटातील कलाकार सुनील शेट्टी यांनी दिली आहे. 'इंडिया टुडे'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये सुनील म्हणाले, "मला हे कळल्यानंतर धक्का बसला. माझी मुलं अथिया व अहान यांनी मला ही बातमी सांगितली. तेव्हा मी विचार केला की, मी परेशला मेसेज करेन. नंतर म्हटलं की, त्याला भेटून, यावर त्याच्याशी चर्चा करेन. याबाबत माझं कोणाशीही काहीही बोलणं झालेलं नाही. अक्षय कुमारलासुद्धा याबाबत काही कल्पना नव्हती.परेश रावल यांच्याबद्दल बोलताना सनील शेट्टी पुढे म्हणाले, "ही खूप मोठी समस्या आहे. आम्ही चित्रपटाच्या चित्रीकरणाला लवकरच सुरुवात करणार होतो. याचे प्रोमोही आम्ही शूट केले आहेत. हा आमच्यासाठी मोठा धक्का आहे." अनेक दिवसांपासून परेश रावल, प्रियदर्शन तसेच 'हेरा फेरी ३' हा चित्रपट चर्चेत आहे. परेश रावल यांनी या चित्रपटात काम न करण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट झाल्यानंतर चित्रपटाच्या चाहत्यांनी त्यावर नाराजी व्यक्त केली."

# अर्चना पूरन सिंह पतीबद्दल काय म्हणाली?

अभिनेत्री अर्चना पूरन सिंह सध्या चर्चेत आहे. अर्चनानं काही दिवसांपूर्वी स्वत:चं यूट्यूब चॅनेल सुरू केलं होतं. ती तिच्या पती व दोन मुलांसह मुंबईतील खाण्याच्या अनेक ठिकाणी जात असून, त्यादरम्यानचे व्हिडीओ ती या चॅनेलमार्फत शेअर करीत असते. अशातच नुकताच तिनं एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. तिनं यापूर्वी पोस्ट केलेल्या व्हिडीओखाली एका चाहत्यानं, "तुम्ही खूप चांगले कपल आहात. त्यामुळे एकमेकांशी भांडू नका", असं म्हटलं होतं. त्यावर अर्चनानं तिची प्रतिक्रिया दिली आहे. यूट्यूब चॅनेलवरील व्हिडीओमधून ती म्हणाली, "मागे पोस्ट केलेल्या व्हिडीओखाली कोणीतरी कमेंट केली होती. त्यामध्ये 'माझं माझ्या नवऱ्याशी भांडण झालं आहे. तुम्ही भांडू नका', असं बरंच काही लिहिलेलं होतं. पण मला तुम्हाला सांगायला आवडेल की, आमच्यात असं कुठलंच भांडण झालेलं नाही. आम्ही 'अशा' पद्धतीनंच एकमेकांसह बोलत असतो. आम्ही भांडतो.

# उर्वशीने टोलर्सना सुनावलं



'कान्स २०२५' या महोत्सवाची सध्या सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे. अनेक कलाकार या 'कान्स'च्या रेड कार्पेटवर विविध लूक करताना दिसत आहेत. अशातच दोन दिवसांपूर्वी बॉलीवूड अभिनेत्री उर्वशी रौतेला रेड कार्पेटवर दिसली होती. ७८ व्या वार्षिक 'कान्स' चित्रपट महोत्सवात 'ओ एजेंट सीक्रेटो'च्या स्क्रीनिंगमध्ये उर्वशी रेड कार्पेटवर दिसून आली होती. यावेळी काळ्या सिल्क गाऊनमध्ये उर्वशी फार सुंदर दिसत होती. यावेळी उर्वशी रेड कार्पेटवर आली आणि तिनं वेगवेगळ्या पोज देण्यास सुरुवात केली. पण तिनं जेव्हा सर्वांना अभिवादन करण्यासाठी हात उंचावला तेव्हा उर्वशीचा ड्रेस डाव्या हाताच्या काखेत उसवला असल्याचे अनेकांच्या निदर्शनास आले. उर्वशीच्या या उसवलेल्या ड्रेसमुळे नेटकऱ्यांनी तिच्यावर टीकेची झोड उठवली.उर्वशीच्या या लूकमधील अनेक फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. ज्यावर नेटकऱ्यांनी कमेंट्स करत "कान्समध्ये फाटलेला ड्रेस परिधान करणारी उर्वशी पहिली भारतीय अभिनेत्री" असं म्हटलं होतं. पण आता या ड्रेसबद्दल स्वत: अभिनेत्रीने खुलासा केला आहे. 'आयएएनएस'शी साधलेल्या संवादात तिने याचं नेमकं कारण सांगितलं आहे. यावेळी उर्वशी म्हणाली, "आम्ही कार्यक्रमासाठी जात असताना आमच्या वाटेत एक ७० वर्षांची वृद्ध महिला आली.

# मी माझ्या हाताची नस कापणार : वामिका गब्बी

अभिनेता शाहरुख खान हा त्याच्या अभिनयासाठी ओळखला जातो. लवकरच तो 'किंग' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. किंग खानबरोबर काम केलेले अनेक कलाकार त्याच्याबद्दल बोलतात. अनेक किस्से सांगतात. शाहरुख खान ज्या पद्धतीने त्याच्या सहकलाकारांशी, त्याच्या सहवासात आलेल्या लोकांबरोबर वागतो, त्याचे कौतुक होताना दिसते. अनेक कलाकार शाहरुखचे कौतुक करताना दिसतात. आता अभिनेत्री वामिका गब्बीनेदेखील शाहरुख खानबद्दल वक्तव्य केले आहे. तिचे वक्तव्य सध्या चर्चेत असल्याचे पाहायला मिळत आहे. अभिनेत्री बॉलीवूडच्या किंग खानबद्दल नेमकं काय म्हणाली, हे जाणून घेऊ...वामिका गब्बीने नुकताच माशाबल इंडियाशी संवाद साधला. त्यावेळी तिने शाहरुख खानबरोबर तिची पहिली भेट कशी होती आणि त्यावेळी काय घडलं होतं, याबद्दल खुलासा केला. बेबी जॉन चित्रपटाचा मुहूर्त होता, त्यावेळी शाहरुख खान १५ मिनिटांसाठी सेटवर आला होता. त्यावेळी माझा भाऊ हार्दिक माझ्याबरोबर सेटवर होता. शाहरुख खान जेव्हा सेटवर आला, तेव्हा सगळे त्याच्याभोवती गोळा झाले. त्याच्याशी बोलत होते. तो सगळ्यांशी बोलत होता. मी आणि माझा भाऊ सगळ्यात मागे होतो. आम्ही एकमेकांशी बोलत होतो. मी माझ्या भावाला विचारले की जर इथून जाण्यासाठी शाहरुख माझ्याशी बोलण्यासाठी आला तर मी त्याच्याशी काय बोलायला पाहिजे, असे तुला वाटते. त्यावर हार्दिक मला गमतीत म्हणाला की तू तुझ्या हाताची नस काप. हे सगळं बोलताना आम्ही हसत होतो. मी बेबी जॉन चित्रपटाचा भाग असल्याने शाहरुख जाताना माझ्याशी बोलण्यासाठी आला. तो म्हणाला, ठीक आहे, बाय. मी त्याला म्हणाले की तुम्हाला भेटून मला आनंद झाला. माझ्या भावाने मला माझ्या हाताची नस कापण्याचा सल्ला दिला होता. पण, मी माझ्या हाताची नस कापणार नाही, असे मी शाहरुख खानला बोलले. माझे बोलणे ऐकल्यानंतर खोलीत शांतता पसरली आणि शाहरुख निघून गेला. तो गेल्यानंतर प्रॉडक्शनमधील एक माणूस माझ्याकडे धावत आला आणि म्हणाला की तू फक्त तुझ्या हाताची नस कापण्याबद्दल बोललीस का? हे ऐकताच मला व माझ्या भावाला आश्चर्य वाटले. कारण, मला प्रामाणिकपणे वाटले होते की शाहरुखला विनोद समजेल. पण, तो त्याला समजला नाही", असे म्हणत शाहरुख खानबरोबरची पहिली भेट विचित्र होती, असे वामिका गब्बी म्हणाली. याच मुलाखतीत राजकुमार रावनेदेखील शाहरुखच्या भेटीबद्दल सांगितले. राजकुमार राव म्हणाला, "मी फराह खानच्या वाढदिवशी शाहरुखला भेटलो. आम्ही खूप गप्पा मारल्या. आम्ही त्यांच्या 'किंग' या चित्रपटावर चर्चा केली. त्यानंतर आम्ही आर्यन खानच्या नवीन शोबद्दल बोललो. शाहरुख खानने माझ्या स्त्री २ या चित्रपटाचे कौतुक केले", अशी आठवण राजकुमार रावने सांगितली.

# नाद करा पण आमचा कुठं..!

## मुंबईने आयपीएल 2025 स्पर्धेतील प्लेऑफमध्ये प्रवेश केला

**| नवी दिल्ली | प्रतिनिधी : महाईन्यूज |**

मुंबई इंडियन्सने करून दाखवलं आहे. गेल्या हंगामात सर्वात शेवटी राहिलेला मुंबई इंडियन्सचा संघ आयपीएल २०२५ स्पर्धेतील प्लेऑफमध्ये प्रवेश करणारा चौथा संघ ठरला आहे. घरच्या मैदानावर खेळताना मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सचा ५९ धावांनी पराभव केला आहे.




आयपीएल २०२५ स्पर्धेतील ६३ वा सामना मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात मुंबई इंडियन्सचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला होता. मुंबई इंडियन्सकडून डावाची सुरुवात करण्यासाठी रायन रिकल्टन आणि रोहित शर्मा ही जोडी मैदानावर आली. या जोडीकडून दमदार सुरुवातीची गरज होती. मात्र, रोहित शर्मा अवघ्या ५ धावांवर माघारी परतला. तर रायन रिकल्टनने २५ धावांची खेळी केली. सलामी जोडी मघाफी परतल्यानंतर सूर्यकुमार यादव शेवटपर्यंत उभा राहिला.ज्या खेळपट्टीवर मोठे फटके खेळणं कठीण होतं, त्या खेळपट्टीवर शेवटी सूर्यकुमार यादवने चौकार – षटकारांचा पाऊस पाडला. मुंबई इंडियन्सकडून सूर्यकुमार यादवने ४३ चेंडूत ७३ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ७ चौकार आणि ४ षटकार मारले. त्याला साथ देत नमन धीरने ८ चेंडूत २४ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर मुंबईने २० षटकांअखेर ५ गडी बाद १८० धावा केल्या.दिल्लीला हा सामना जिंकण्यासाठी १८१ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना दिल्लीला हवी तशी सुरूवात करता आली नाही. केएल राहुल अवघ्या ११ धावांवर तंबूत परतला. तर फाफ डू प्लेसिस ६, अभिषेक पोरेल ६ धावांवर माघारी परतला. विपराग निगमने आक्रमक फटकेबाजी करत २० धावा चोपल्या. शेवटी समीर रिझवी आणि आशुतोष शर्माने संघाला विजयापर्यंत घेऊन जाण्याचा पूर्ण प्रयत्न केला. मात्र मुंबईचे गोलंदाज दिल्लीच्या फलंदाजांवर भारी पडले. मिचेल सँटनर, ट्रेन्ट बोल्ट आणि जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीसमोर दिल्लीच्या फलंदाजांनी नांग्या टाकल्या.या सामन्याआधी गुजरात टायटन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज या ३ संघांनी प्लेऑफमध्ये प्रवेश केला होता. आता दिल्लीला नमवत मुंबईने प्लेऑफमध्ये प्रवेश केला आहे. मुंबईचा संघ प्लेऑफमध्ये प्रवेश करणारा चौथा संघ ठरला आहे. आयपीएल २०२५ स्पर्धेतील ६३ वा सामना मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात मुंबई इंडियन्सचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला होता. मुंबई इंडियन्सकडून डावाची सुरुवात करण्यासाठी रायन रिकल्टन आणि रोहित शर्मा ही जोडी मैदानावर आली. या जोडीकडून दमदार सुरुवातीची गरज होती. मात्र, रोहित शर्मा अवघ्या ५ धावांवर माघारी परतला. तर रायन रिकल्टनने २५ धावांची खेळी केली. सलामी जोडी मघाफी परतल्यानंतर सूर्यकुमार यादव शेवटपर्यंत उभा राहिला.ज्या खेळपट्टीवर मोठे फटके खेळणं कठीण होतं, त्या खेळपट्टीवर शेवटी सूर्यकुमार यादवने चौकार – षटकारांचा पाऊस पाडला.

### दिल्लीच्या फलंदाजांनी नांग्या टाकल्या

या खेळीदरम्यान त्याने ७ चौकार आणि ४ षटकार मारले. त्याला साथ देत नमन धीरने ८ चेंडूत २४ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर मुंबईने २० षटकांअखेर ५ गडी बाद १८० धावा केल्या.दिल्लीला हा सामना जिंकण्यासाठी १८१ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना दिल्लीला हवी तशी सुरूवात करता आली नाही. केएल राहुल अवघ्या ११ धावांवर तंबूत परतला. तर फाफ डू प्लेसिस ६, अभिषेक पोरेल ६ धावांवर माघारी परतला. विपराग निगमने आक्रमक फटकेबाजी करत २० धावा चोपल्या. शेवटी समीर रिझवी आणि आशुतोष शर्माने संघाला विजयापर्यंत घेऊन जाण्याचा पूर्ण प्रयत्न केला. मात्र मुंबईचे गोलंदाज दिल्लीच्या फलंदाजांवर भारी पडले. मिचेल सँटनर, ट्रेन्ट बोल्ट आणि जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीसमोर दिल्लीच्या फलंदाजांनी नांग्या टाकल्या.या सामन्याआधी गुजरात टायटन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज या ३ संघांनी प्लेऑफमध्ये प्रवेश केला होता.

# कुलदीप यादवने घडवला इतिहास!

## रिकल्टनची विकेट घेताच मिळवलं दिग्गज खेळाडूंच्या यादीत स्थान

**| नवी दिल्ली | प्रतिनिधी : महाईन्यूज |**

आयपीएल स्पर्धेतील ६३ वा सामना मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये सुरू आहे. वानखेडे स्टेडियमवर सुरू असलेला हा सामना प्लेऑफच्या दृष्टीने दोन्ही संघांसाठी अतिशय महत्वाचा आहे. या सामन्यात दिल्लीचा संघ प्रथम गोलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला आहे. दरम्यान प्रथम गोलंदाजी करताना फिरकी गोलंदाज कुलदीप यादवच्या नावे मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे.



कुलदीप यादव हा तिन्ही फॉरमॅटमध्ये भारतीय संघातील प्रमुख गोलंदाज आहे. त्याच्या फिरकीची जादू आयपीएल स्पर्धेतही पाहायला मिळाली आहे. या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. दिल्लीकडून गोलंदाजी करताना कुलदीप यादवने विस्फोटक फलंदाज रायन रिकल्टनला झेलबाद करत माघारी धाडलं. हा कुलदीप यादवच्या आयपीएल कारकिर्दीतील १०० वा विकेट ठरला आहे.

कुलदीप यादवने हा कारनामा आपल्या आयपीएल २०२५ स्पर्धेतील ६३ व्या सामन्यात करून दाखवला आहे. रायन रिकल्टन हा त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील १०० वा विकेट ठरला आहे. यासह तो आयपीएल स्पर्धेत १०० विकेट्स घेणारा जगातील २९ वा गोलंदाज ठरला आहे. कुलदीप यादवच्या आयपीएल कारकिर्दीबद्दल बोलायचं झालं तर, त्याने २०१६ मध्ये मुंबई इंडियन्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यातून आपल्या आयपीएल कारकिर्दीची सुरूवात केली होती. त्याने आतापर्यंत ९७ सामन्यांमध्ये २७ च्या सरासरीने १०० विकेट्स घेतल्या आहेत.

यादरम्यान त्याने ४ वेळेस एकाच डावात ४ विकेट्स घेण्याचा कारनामा केला आहे. कुलदीप यादव हा तिन्ही फॉरमॅटमध्ये भारतीय संघातील प्रमुख गोलंदाज आहे. त्याच्या फिरकीची जादू आयपीएल स्पर्धेतही पाहायला मिळाली आहे. या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. दिल्लीकडून गोलंदाजी करताना कुलदीप यादवने विस्फोटक फलंदाज रायन रिकल्टनला झेलबाद करत माघारी धाडलं. हा कुलदीप यादवच्या आयपीएल कारकिर्दीतील १०० वा विकेट ठरला आहे.

### कुलदीपच्या 100 विकेट्स पूर्ण

रायन रिकल्टन हा त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील १०० वा विकेट ठरला आहे. यासह तो आयपीएल स्पर्धेत १०० विकेट्स घेणारा जगातील २९ वा गोलंदाज ठरला आहे.कुलदीप यादवच्या आयपीएल कारकिर्दीबद्दल बोलायचं झालं तर, त्याने २०१६ मध्ये मुंबई इंडियन्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यातून आपल्या आयपीएल कारकिर्दीची सुरूवात केली होती.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। गुरुवार ।
। दि. 22 मे 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ऊर्जा संरक्षण स्पर्धा 2025 ” संपन्न

# उद्योगांमध्ये ऊर्जा बचतीचे उलगडले अनेक पर्याय!

### उद्योग विश्व: क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया, पुणे शाखेच्या वतीने स्पर्धा उत्साहात



। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया, पुणे शाखेच्या वतीने “ऊर्जा संरक्षण स्पर्धा २०२५ ” संपन्न झाली. या स्पर्धेच्या माध्यमातून उद्योग विश्वामध्ये ऊर्जा बचतीचे पर्याय वापरले जावेत त्या माध्यमातून जागतिक स्तरावर ऊर्जा बचत केली जाईल या उद्देशाने स्पर्धकांकडून केस स्टडीचे सादरीकरण घोषवाक्य आणि पोस्टर स्पर्धा घेण्यात आले. या उपक्रमाला प्रतिसाद मिळाला.**

## केसस्टडी सादरीकरण, घोषवाक्य व पोस्टर स्पर्धेतून स्पर्धकांनी मांडले ऊर्जा बचतीचे उपाय

ऊर्जा सेवांचा कमी वापर करून किंवा ऊर्जा अधिक कार्यक्षमतेने वापरून ऊर्जा संरक्षणासाठी जागतिक स्तरावर विविध प्रयत्न केले जात आहेत. अशा प्रयत्नांचा उद्देश म्हणजे एकूण ऊर्जा वापरात कपात करणे. उद्योगांनी या दिशेने अधिक प्रयत्न करावेत यासाठी, क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया ( क्यू.सी.एफ. आय ) पुणे शाखेच्या वतीने “ऊर्जा संरक्षण स्पर्धा २०२५” या विषयावर स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत केस स्टडीचे सादरीकरण, घोषवाक्य व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सहभागी स्पर्धकांनी पारंपारीक उर्जे ऐवजी सोलर , पवनचक्की आदी पर्यायी ऊर्जा स्तोत्राचा वापर कसा करता येवू शकतो याबाबतीत केस स्टडी सादरीकरणात आपली मनोगते मांडली.

सदर स्पर्धा हायब्रिड पद्धतीने आयोजित करण्यात आली. क्वालिटी सर्कल एक्सलन्स सेंटर भोसरीयेथे प्रत्यक्ष सादरीकरण पार पडले. २ जून रोजी हेच प्रात्यक्षिक ऑनलाइन सादरीकरण होणार आहे.या स्पर्धात २२ संस्थांमधून १५१ सहभागी उपस्थित होते. केस स्टडी, घोषवाक्य व पोस्टर या श्रेणींत ७२ नामांकन प्राप्त झाले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे क्यूसीएफआयचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश मिश्रा, विशेष अतिथी म्हणून क्यूसीएफआयचे कार्यकारी संचालक दिनेश कुमार श्रीवास्तव , प्रेसिडेंट एमेरिटस सतीश काळोखे आणि संचालिका डॉ. रजनी इंदुलकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आले. पुणे विभागीय परिषदेचे सदस्य संजीव शिंदे, डॉ. अजय फुलंबरकर, अनंत क्षीरसागर, भूपेश माल, धनंजय वाघोलीकर व परवीन तरफदार यांची ही कार्यक्रमाला उपस्थित होते. केस स्टडीचे परीक्षण अनंत क्षीरसागर, भूपेश माल, वेंकटेश पेड्डी आणि प्रशांत मुदलवडकर यांनी केले.तर घोषवाक्य व पोस्टरचे परीक्षण परवीन तरफदार व धनंजय वाघोलीकर यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजन रहीम मिर्झाबेग, प्रशांत बोराटे आणि चंद्रशेखर रुमाले यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया रुमाले यांनी केले.


ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
"यत् भावो – तत् भवति"
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> Basic Java
> Basic Tally
From
26th May 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292


EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org